# शेणगांव येथील सणगरांची सहकारी सोसायटी

म. शं. आठवले

वाई तालुक्यांतील खुटेकर धनगरांच्या घोंगडी विणण्याच्या धंद्यासंबंधीं श्री. म. भा. जगताप यांनीं केलेली पाहणी आणि निष्कर्ष * अर्थविज्ञान, वर्ष २, अंक १ मध्यें वाचावयाला मिळाले. दुसऱ्या एका खेडेगांवांत या धंद्याची तपशीलवार पहाणी करीत असतांना जी माहिती उपलब्ध झाली ती या लेखांत दिली आहे. घोंगड्या विणण्याच्या ग्रामीण व्यवसायांत भांडवल-पुरवठा, बाजारपेठेची अनुकूलता आणि विक्रीची व्यवस्था इत्यादि बाबतीत येणाऱ्या अडचणी दोन्ही ठिकाणीं सारख्याच असून सहकारी पद्धतीनें अशा अडचणींना तोंड देण्याचा प्रयत्न दोन्ही ठिकाणच्या विणकरांनीं केलेला दिसतो. सारखेपणा असूनहि दोन गांवांतील धंद्याच्या परिस्थितींत आज फरक पडलेला दिसतो; असा फरक पडण्याच्या कारणांची मीमांसा उपयुक्त ठरेल. तुलनात्मक दृष्टीनें असा अभ्यास करण्यासाठीं उपयोगी पडेल अशी माहिती पुढें दिली आहे.

शेणगांव या खेड्यांत सणगर या जातीचे लोक आहेत, व ते घोंगड्या विणणें व विकणें हा व्यवसाय करतात. त्याबद्दलची माहिती देण्यापूर्वीं या गांवाबद्दल व लोकांबद्दल थोडा तपशील देणें योग्य होईल. कोल्हापूर जिल्ह्यांतील भुदरगड तालुक्यांत शेणगांव हें गांव आहे. गारगोटी या सध्यांच्या तालुक्याच्या ठिकाणापासून तें अंदाजें तीन मैलांवर वेदगंगा नदीच्या कांठावर वसलेलें आहे. हा तालुका एकंदरींत डोंगराळ असून सरासरी पावसाचें प्रमाण ८० ते ९० इंच आहे. त्यामुळें पुष्कळ जंगल आहे. तालुक्यांत दळणवळणाचीं साधनें फार अपुरीं आहेत. पावसाळ्यांत पुष्कळ गांवांशीं दळणवळण जवळजवळ बंद असतें. उन्हाळ्यांतहि पुष्कळ गांवांना पायींच जावें लागतें. कोल्हापूर-गारगोटी-पाटगांव ही एकमेव पक्की सडक आहे. मुख्य पीक भाताचें आहे. फक्त वेदगंगेच्या खोऱ्यांत अलीकडे बराच ऊंस पिकविला जातो. एकंदरींत भाग मागासलेला व दरिद्री असा आहे.

शेणगांव गांवाचें क्षेत्रफळ अंदाजें तीन चौरस मैल असून तेथील फक्त २५ टक्के जमीन लागवडीखालीं असून बाकी जंगल आहे. गांवाची लोकसंख्या सन १९४१ सालीं १४६० होती ती आतां १९६० मध्यें अंदाजें १८०० असावी. हिंदूंमधील बहुतेक जातींचे लोक, तसेंच मुसलमान व ख्रिश्चनधर्मीय लोक येथें आढळतात. बहुतेकांचा पिढीजाद व्यवसायच आहे. शेतीवर संपूर्णपणें अवलंबून असलेला समाज अंदाजें २५ टक्के आहे. बाकीचा समाज थोडी शेती व बाकी इतर व्यवसाय आणि व्यापार-उदीम करणारा आहे. सुमारें २५ वर्षांपूर्वीं ह्या भागांतील व्यापाराचें शेणगांव हें मोठें व जुनें केंद्र होतें. पूर्वीचें तालुक्याचें मुख्य ठिकाण असलेल्या भुदरगडाकडे जाणारा रस्ता आणि रत्नागिरी जिल्ह्याकडे जाणारा व बैलांवरून होणाऱ्या वाहतुकीचा रस्ता या गांवावरून असल्यामुळें त्याला बाजारपेठेचें महत्त्व पूर्वीं होतें.

गारगोटी हें तालुक्याचें ठिकाण झाल्यापासून मात्र शेणगांवचें महत्त्व कमी होऊन गारगोटी व कडगांव या गांवांकडे व्यापार वळला असून शेणगांवची स्थिति खालावत गेली आहे.

* जगताप म. भा., " एका खेडेगांवांतील घोंगड्या विणण्याच्या धंद्याची पाहणी ", अर्थविज्ञान, वर्ष २ अंक १, पृष्ठें १५–२८.